
लोकसत्ता YCMOU PRO LKST M6 100125

# वसंत कानेटकर यांच्याविषयी आज परिसंवाद

## रामदास भटकळ, प्रतिमा कुलकर्णी, सतीश आळेकर, माधव वझे आदी दिग्गजांचा सहभाग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** साहित्य अकादमी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि मराठा विद्या प्रसारक समाज संस्था यांच्या सहकार्याने नाटककार वसंत कानेटकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शुक्रवारी ''वसंत कानेटकर : व्यक्ती आणि साहित्य'' या विषयावर के. टी. एच. एम. महाविद्यालयाच्या व्ही.एल.सी. सभागृहात परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. परिसंवादाचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते सकाळी १० वाजता होणार आहे.



मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस अॅड. नितीन ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक तथा साहित्य अकादमीचे केंद्रीय कार्यकारी मंडळ सदस्य विश्वास पाटील राहणार आहेत. यावेळी मुक्त विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण विद्या शाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम, साहित्य अकादमी मुंबईचे प्रभारी अधिकारी ओम प्रकाश नागर, अकादमीचे सामान्य परिषदेचे सदस्य डॉ. दिलीप धोंडगे, मराठा विद्या प्रसारक संस्थेचे शिक्षणाधिकारी भास्कर ढोके, अंजली कानेटकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

परिसंवाद उद्घाटनानंतर दुपारी ११.४५ ते १२.०० या वेळेत नाटककार कानेटकर यांच्याविषयी डॉ. वृन्दा भार्गवे यांनी केलेला चरित्रपट दाखवण्यात येईल. त्यानंतर प्रथम सत्रात दुपारी १२.०० ते १.३० या वेळेत 'कानेटकरांची पौराणिक व ऐतिहासिक नाटके' (उल्हास रत्नपारखी), 'कानेटकरांची चरित्रात्मक नाटके' (नाटककार आशुतोष पोतदार) आणि 'कानेटकरांची सामाजिक नाटके' (ज्येष्ठ दिग्दर्शक प्रतिमा कुलकर्णी) या विषयावरील निबंध वाचन करण्यात येईल. अध्यक्षस्थान ज्येष्ठ नाटककार व अभ्यासक सतीश आळेकर भूषविणार आहेत.

द्वितीय सत्रात दुपारी २.३० ते सायंकाळी ४.०० या वेळेत 'कानेटकरांच्या नाटकांची समकालीनता' याविषयी ज्येष्ठ दिग्दर्शक विजय केंकरे, डॉ. प्रवीण भोळे हे संवाद साधतील. स्वानंद बेदरकर हे कानेटकरांचे कथात्म साहित्य या विषयावर विवेचन करतील. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समीक्षक व अभिनेते माधव वझे असतील.

ज्येष्ठ साहित्यिक तथा पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ यांच्या विवेचनाने या परिसंवादाचा समारोप होईल. अध्यक्षस्थानी हेमंत टकले राहणार आहेत.

10/01/2025 | Nashik | Page : 06
Source : https://epaper.loksatta.com